# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ७४–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. संजय शामराव महाडिक,<br>मु. पो. शेगांव, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय जत, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. संजय शामराव महाडीक, मु.पो. शेगांव, जत, जि. सांगली यांनी घरगुती वापरासाठी नवीन वीज कनेक्शनची मागणी केलेली आहे व अर्ज देवून वि.प.ने पुढील कृती न केल्याने भरपाई व वीज जोडणी द्यावी व तशा पध्दतीचा आदेश वि.प.स देण्यात यावा अशी मागणी मंचाकडे केलेल्या अर्जात नोंदविली आहे. सदरचा अर्ज मंचात आर.पी.ए.डी.ने दि. १८.३.२०१० रोजी प्राप्त झाला आहे. तत्पूर्वी दि. २९.१.२०१० रोजी अंतर्गत कक्षात तक्रार केल्याचे नोदविले आहे, तशी पोच ग्राहकाने दफ्तरी दाखल केली आहे.

सदरचा अर्ज दाखल करुन घेवून मंचाने प्राथमिक कार्यवाही पूर्ण करुन दि. ३.५.२०१० रोजी मंचा कार्यालयात सुनावणीसाठी उभयतांना कळविले. सदर दिवशी तक्रारदार ग्राहक गैंहजर होत. तथापि वि.पे.च प्रतिनिधी उपस्थित होते.

ग्राहकाचा अर्ज, सोबतची कागदपत्रे, वि.प.चा अभिप्राय, सुनावणी दरम्यानचे कथन याचे अवलोकन करुन मंच खालील निष्कर्षाप्रत आला आहे. ग्राहकाने दि. २३.१.२०१० रोजी वि.प.कडे रु. २५/– भरणा केलेला आहे व आपले घरगुती वीज कनेक्शनच्या नव्या जोंडणी संदर्भातील मागणी नोंदविली आहे. त्यानंतरच्या पुढील कार्यवाही संदर्भात वि.प.कडून उचित कृती होणे अपेक्षित आहे. आपल्या मुद्देनिहाय अहवालात वि.प.ने दि. २३.१.२०१० रोजी ए १ फॉर्म मिळाल्याने व १९.४.२०१० रोजी खर्च करावयाच्या संबंधीचे चलन दिल्याचे तसेच ग्रहकाने सदरचे चलन दि. २४.४.२०१० रोजी भरल्याचे नमूद करुन चाचणी अहवाल अद्यापही जमा केला नसल्याचे नमूद केले आहे. आवश्यक ते काम टेस्ट रिपोर्ट आणि आवश्यक ते कागदपत्र दाखल केल्यानंतर पूर्ण करुन विहित मुदतीत जोडणी देता येईल असे नमूद केले आहे. सदरचा अभिप्राय सादर करतांना किंवा सुनावणीच्यावेळी चलन देण्यास झालेल्या विलंबाबद्दल खुलासा वि.प.ने नोंदविलेला नाही. तसेच सदरची वीज जोडणीचे स्वरुप म्हणजेच त्यासाठी सर्व्हीस कनेक्शनवरुन जोडणी देण्यात येणार आहे किंवा कसे किंवा सदर कामासाठी वाहिनीचा विस्तार करावा लागणार आहे या आवश्यक बाबी मंचाच्या निदर्शनास आणून दिलेल्या नाहीत. त्यामुळे मंच दाखल कागदपत्रांच्या आधारे निर्णय घेत आहे. दि. २३.१.२०१० रोजी अर्ज दाखल केला आहे हे निश्चित करुन त्यानंतर ३० दिवसांचा कालावधी वाहिनी विस्तार करावयाचे असे गृहीत धरुन ३० दिवसांची मुदत विनियमात चलन देण्यासंबंधी नमूद करण्यात आली आहे. त्याचा संदर्भ घेवून दि. २२.२.२०१० पर्यंत चलन देणे अपेक्षित होते, तथापि ते वि.प.ने १९.४.२०१० रोजी दिले असल्याचे नमूद केल्याने दि. २२.२.२०१० ते दि. १९.४.२०१० या ८ आठवड्यांच्या विलंबासाठी विनियमातील तरतुदीनुसार रु. १००/– प्रति आठवड्यांस किंवा त्याच्या भागास या प्रमाणे रु. ८००/– भरपाई म्हणून वि.प.ने ग्राहकास द्यावी असे मंच आदेशान्वये स्पष्ट करत आहे.

ग्राहकाने वीज जोडणी संदर्भात भरपाई बरोबरच मागणी नोंदविलेली आहे. तथापी वि.प.कडे विचारणा करुन चाचणी अहवाल देण्याची जबाबदारी ग्राहकाने पार पाडावयास पाहिजे हेही नक्की आहे. त्यामुळे चाचणी अहवाल दिल्याच्या तारखेनंतर वाहिनीचा विस्तार गृहीत धरुन ३ महिन्याचे आंत जोडणी देण्यात यावी असे मंच वि.प.स आदेशान्वये सूचित करीत आहे. सबब खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१) वर तपशिलांत नोंद केल्याप्रमाणे ८ आठवड्यांच्या विलंबासाठी भरपाई म्हणून रु. ८००/– वि.प.ने ग्राहकास द्यावेत.

२) चाचणी अहवाल दिल्याच्या तारखेनंतर ३ महिने मुदतीचे आंत वि.प.ने ग्राहकास वीज जोडणी देण्यात यावी.

३) वीज जोडणी दिल्यानंतर देण्यात येणाऱ्या सलग दोन वीज बिलामध्ये सदरच्या रकमेचे समायोजन करावे.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. सी. लेले )
सदस्य

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :